RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ८] सोमवार, जानेवारी १८, २०१६/पौष २८, शके १९३७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जानेवारी २०१६

अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेनिवे. २०१४/प्र.क्र. १२४/सेवा-४.—भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०९ च्या, परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ ला आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ (यात यापुढे ज्याचा उल्लेख " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम ९ मधील—

(अ) (१) खंड (३६) (एक) मध्ये पोट खंड तीन मध्ये ' वित्तलब्धी ' या शब्दानंतर ' यामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश होईल ' या वाक्याचा समावेश दिनांक १ जानेवारी २००६ पासून होईल ;

(२) खंड (३६) (एक) मध्ये पोट खंड (चार) नंतर दिनांक १ जानेवारी २००६ पासून खालील उप-नियम जादा दाखल करण्यात येईल—

" (पाच) वेतन म्हणजे शासकीय कर्मचारी त्याच्या निवृत्तीपूर्वी किंवा मृत्युच्या लगतच्या दिनांकापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार विहीत पे-बँड मध्ये आहरित करीत असलेले वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन, त्यामध्ये विशेष वेतनाचा समावेश नसेल ";

(ब) खंड (३८) मध्ये " अर्जित केलेले सरासरी वेतन " या शब्दानंतर खालील मजकूर दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून दाखल करण्यात येईल—

" किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेले वेतन यापैकी जी रक्कम त्याला लाभदायक ठरेल ".

३. मुख्य नियमाच्या नियम १० मधील—

उपनियम (६) (बी) मध्ये " वित्त विभागाच्या सहमतीने " हा मजकूर दिनांक २ जून २००३ पासून वगळण्यात येत आहे.

४. मुख्य नियमाच्या नियम २६ मधील—

(अ) उपनियम (१) मध्ये—

(१) " निवृत्तीवेतन " या शब्दाऐवजी " निवृत्तीवेतन किंवा कुटुंब निवृत्तीवेतन " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(२) " निवृत्तीवेतनधारक " या शब्दाऐवजी " निवृत्तीवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तीवेतनधारक " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(३) परंतुकामध्ये " निवृत्तीवेतन " शब्द जिथे आहे तिथे त्या शब्दाऐवजी " निवृत्तीवेतन किंवा कुटुंब निवृत्तीवेतन " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(ब) उपनियम (२) मध्ये " निवृत्तीवेतनधारक " या शब्दाऐवजी " निवृत्तीवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तीवेतनधारक " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

५. मुख्य नियमाच्या नियम २७ मधील—

(अ) उपनियम (१) मधील " शासन " या शब्दाऐवजी " नियुक्ती प्राधिकारी " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत ;

(ब) उपनियम (२) (बी) (१) मधील " शासन " या शब्दाऐवजी " नियुक्ती प्राधिकारी " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत.

६. मुख्य नियमाच्या नियम ४० मधील—

उपनियम (ई) मधील " शासनाच्या विशेष आदेशान्वये " या शब्दाऐवजी " नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आदेशानुसार " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत.

७. मुख्य नियमाच्या नियम ४६ मधील—

(अ) उपनियम (४) मधील " नियुक्ती प्राधिकारी " या शब्दाऐवजी " शासन " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत ;

(ब) उपनियम (५) मधील " नियुक्ती प्राधिकारी " या शब्दाऐवजी " शासन " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत ;

(क) उपनियम (६) मधील " नियुक्ती प्राधिकारी " या शब्दाऐवजी " शासन " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून दाखल करण्यात येत आहेत.

८. मुख्य नियमाच्या नियम ४८ मधील—

उपनियम (१) नंतर असलेल्या परंतुकानंतर " नियम ३३ करीता शासकीय कर्मचाऱ्यांची अशी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरली जाईल " हे परंतुक दाखल करण्यात येत आहे.

९. मुख्य नियमाच्या नियम ६५ मधील—

उपनियम (२) (बी) मधील " वित्त विभागाच्या सहमतीने " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून वगळण्यात येत आहेत.

१०. मुख्य नियमाच्या नियम ६६ मधील—

उपनियम (४) (बी) मधील " वित्त विभागाच्या सहमतीने " हे शब्द दिनांक २ जून २००३ पासून वगळण्यात येत आहेत.

११. मुख्य नियमाचा नियम ६६ए दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून वगळण्यात येत आहे.

१२. मुख्य नियमाच्या नियम ११० मधील उपनियम (२) ऐवजी खालील उपनियम दिनांक २७ फेब्रुवारी २००९ पासून समाविष्ट करण्यात येत आहे.

" (२) (ए) वीस वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर या नियमातील तरतुदीनुसार नियतवयोमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तीवेतनावर सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास, उच्चतम मूळ वेतन रुपये ६७,००० अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतनाच्या मर्यादेत, त्याच्या निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून अनुज्ञेय होईल.

(बी) दहा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त परंतु वीस वर्षांपेक्षा कमी एवढी अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर या नियमातील तरतुदीनुसार नियतवयोमान, पूर्ण सेवा, रुग्णता किंवा भरपाई निवृत्तीवेतनावर सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास, उच्चतम मूळ वेतन रुपये ६७,००० अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतनाच्या मर्यादेत, त्याच्या निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून अनुज्ञेय होईल आणि कोणत्याही बाबतीत निवृत्तीवेतनाची रक्कम दरमहा एक हजार नऊशे तेरा रुपयांहून कमी असता कामा नये. "

१३. मुख्य नियमाच्या नियम १११ मध्ये—

(अ) उपनियम (२) मधील परंतुकातील " एक लाख रुपयांहून " या मजकुराऐवजी " सात लाख रुपयांहून " हा मजकूर दिनांक १ जानेवारी २००६ पासून दाखल करण्यात येत आहे ;

(ब) उपनियम (५) (एक) मध्ये " पत्नी " या शब्दाऐवजी " कायदेशीर पत्नी " या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे ;

(क) उपनियम (५) (दोन) मध्ये " पती " या शब्दाऐवजी " कायदेशीर पती " या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

१४. मुख्य नियमाच्या नियम ११६ मध्ये—

(अ) उपनियम (२) मध्ये " अशा कुटुंब निवृत्तीवेतनाची रक्कम " पासून " रुपये ६०० व कमाल रुपये १२०० " या आकड्यापर्यंतच्या मजकुराऐवजी " कुटुंब निवृत्तीवेतनाची परिगणना मूळ वेतनाच्या ३० टक्के अशा एकरूप दराने काढण्यात येईल व या कुटुंब निवृत्तीवेतनाची कमाल मर्यादा राज्य शासनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या ३० टक्के अशी राहील " हा मजकूर दिनांक १ जानेवारी १९९६ पासून दाखल करण्यात येत आहे ;

(ब) उपनियम (४) (ए) (एक) मधील " शासकीय कर्मचाऱ्यांच्या मृत्युच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून सात वर्षांचा कालावधी किंवा मृत शासकीय कर्मचारी हयात राहिला असता तर तो ज्या दिनांकास ६५ वर्षे वयाचा झाला असता त्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी कमी असेल त्या कालावधीसाठी " या मजकुराऐवजी " संबंधित कर्मचाऱ्याच्या मृत्युच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून १० वर्षांपर्यंत उच्च दराने निवृत्तीवेतन मिळेल " हा मजकूर दिनांक १ जानेवारी २००६ पासून दाखल करण्यात येत आहे ;

(क) उपनियम (१६) (बी) (तीन) नंतर पुढील उपनियम जादा दाखल करण्यात येईल—

(चार) " एकुलते एक अपत्य आहे अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या संदर्भात त्याने नमुना क्र. ३-अ मध्ये भरून दिलेल्या माहितीप्रमाणे ज्यांना उपजिविकेचे इतर कोणतेही साधन नाही असे अनुक्रमे आई, वडील या क्रमाने ."

**खुलासा (१)**—या पोट-खंडाकरिता एकुलते एक अपत्य आहे असा शासकीय कर्माचारी म्हणजे जो त्याच्या आई-वडिलांचे हयात असलेले एकुलते एक अविवाहित अपत्य आहे किंवा विवाहित असल्यास ज्याची पत्नी किंवा मुले हयात नाहीत.

**खुलासा (२)**—नियम ११६ (१६) (बी) मध्ये केलेल्या कुटुंबाच्या व्याख्येतील उपनियम (एक) (दोन) (तीन) मध्ये नमूद कुटुंबातील सदस्य हयात नसल्यास या उपनियमाखालील कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरेल.

१५. मुख्य नियमातील परिशिष्ट – पाच मध्ये नमुना-३ नंतर खालील नमुना समाविष्ट करण्यात यावा :—

नमुना क्र. ३-अ

[नियम ११६ (१६)(ब)(४)]

**शासकीय कर्मचाऱ्याने विभाग प्रमुख/किमान वर्ग-१ दर्जाच्या कार्यालयप्रमुखासमोर सादर करावयाचे घोषणापत्र**

मी, श्री./श्रीमती/कुमारी ........................................................................................ वय .......... वर्ष, कायमचा पत्ता ........ .................................................................. सध्याचा पत्ता .................................................................. .................. असे सत्यप्रतिज्ञेवर घोषित करतो/करते की,

(१) मी घोषणापत्राच्या दिनांकास ........................................................................................ या विभागात/ कार्यालयात .................. पदावर कार्यरत आहे/होतो (सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या बाबतीत) आणि मला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार निवृत्तीवेतन विषयक लाभ अनुज्ञेय आहेत.

(२) माझी आई श्रीमती .................................................... वय ............ वर्ष आणि किंवा माझे वडिल श्री. .................... वय ............ वर्ष माझेसोबत वर निर्देशित केलेल्या पत्त्यावर रहात आहेत आणि त्यांना चरितार्थाचे साधन नसल्याने ती/ते पूर्णतः माझ्यावर अवलंबून आहेत/निवृत्तीवेतन विषयक लाभ घेत आहे.

(३) मी, आई आणि किंवा वडिल यांच्यासोबतचा एकत्रित फोटो *खाली चिकटवलेला आहे.

*( सदर फोटो संबंधित कर्मचाऱ्याने त्याच्या/तिच्या सध्याच्या विभाग प्रमुख/किमान वर्ग-१ दर्जाच्या कार्यालय प्रमुखासमोर साक्षांकित करावा किंवा निवृत्तीवेतनधारकाच्या बाबतीत त्याच्या/तिच्या सेवेतील अंतिम कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखासमोर साक्षांकित करावा.)

शासकीय कर्मचारी/निवृत्तीवेतनधारकाची सही

दिनांक :

ठिकाण :

कार्यालयाचा शिक्का

कार्यालय प्रमुखाची सही

पदनाम.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ना. भा. रिंगणे,

शासनाचे उप सचिव.

# FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 18th January 2016

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Senive. 2014/C.R. 100/Ser-4.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Pension) (Amendment) Rules, 2016.

2. In rule 9 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 (hereinafter referred to as "the Principal Rules"),—

(*a*) in clause (36),—

(*i*) in ' sub-clause (iii) after the word 'Government', the words "including Non-Practicing allowance" shall be added and shall be deemed to have been added with effect from the 1st January 2006.

(*ii*) after sub-clause (iv), the following sub-clause shall be added and shall be deemed to have been added with effect from the 1st January 2006 namely.—

"(*v*) in the 6th Pay Commission, the pay drawn in the prescribed pay band plus applicable grade pay but does not include any other type of pay like special pay, which the Government Servant was receiving immediately before his retirement or on the date of his death."

(*b*) in clause (38), after the words "ten month's service" the words and figures" or last month's pay, whichever is more beneficial to the Government Servant shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 27th February 2009.

3. In rule 10 of the Principal Rules, in sub-rule (6), in clause (*b*), the words " with the concurrence of the Finance Department" shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from the 2nd June 2003.

4. In rule 26 of the Principal Rules,—

(*a*) in sub-rule (1),—

(*i*) for the word "pension" at both the places it occurs, the words "pension or family pension" shall be substituted;

(*ii*) for the word "pensioner" the words "pensioner or family pensioner" shall be substituted;

(*iii*) in the proviso, for the word "pension" wherever it occurs the words "pension or family pension" shall be substituted;

(*b*) in sub-rule (2), for the word "pensioner" the words "pensioner or family pensioner" shall be substituted.

5. In rule 27 of the Principal Rules,—

(*a*) in sub-rule (1), for the words "Government may" the words "Appointing authority may" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003 ;

(*b*) in sub-rule (2) in clause (b), in sub-clause (i), for the words " the Government" the words "Appointing authority" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003.

6. In rule 40 of the Principal Rules, in clause (*e*), for the words " special orders of Government" the words "orders of Appointing authority" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003.

7. In rule 46 of the Principal Rules,—

(*a*) in sub-rule (4), for the words "Appointing authority" the word " Government" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003 ;

(*b*) in sub-rule (5), for the words "Appointing authority" the word " Government" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003 ;

(*c*) in sub-rule (6), for the words "Appointing authority" the word " Government" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 2nd June 2003.

8. In rule 48 of the Principal Rules, in sub-rule (1), after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely—

" provided further that, such service of the Government Servant shall be count as qualified service for the purposes of rule 33."

9. In rule 65 of the Principal Rules, in sub-rule (2), in clause (*b*), the words " with the concurrence of the Finance Department," shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from the 2nd June 2003.

10. In rule 66 of the Principal Rules, in sub-rule (4), in clause (*b*), the words " with the concurrence of the Finance Department" shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from the 2nd June 2003.

11. Rule 66 A of the Principal Rules shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from the 27th February 2009.

12. In rule 110 of the Principal Rules, for sub-rule (2), the following sub-rule shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 27th February 2009, namely—

"(2) (*a*) In case of Government Servant retiring on Superannuation, Retiring, Invalid or Compensation Pension in accordance with the provisions of these rules after completing

qualifying service of not less than twenty years, the amount of pension shall be calculated at fifty per cent of the 'Pensionable Pay' subject to maximum of Rs.67,000 plus admissible grade pay.

(*b*) In the case of a Government Servant retiring on Superannuation, Retiring, Invalid or Compensation Pension in accordance with the provisions of these rules before completing qualifying service of twenty years but after completing qualifying service of ten years, the amount of pension shall be calculated at fifty per cent of the 'Pensionable Pay' subject to maximum of Rs.67,000 plus admissible grade pay and in no case the amount of pension shall not be less than Rupees One Thousand Nine Hundred and Thirteen per month.

13. In rule 111 of the Principal Rules,—

(*a*) In sub-rule (2), in the proviso, for the words "one lakh rupees" the words "Seven Lakh Rupees" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2006 ;

(*b*) in sub-rule (5),—

(*i*) in clause (i), for the word "wife" the words "legally wedded wife" shall be substituted;

(*ii*) in clause (ii), the word "husband" the words "legally wedded husband" shall be substituted.

14. In rule 116 of the Principal Rules,—

(*a*) in sub-rule (2), for the portion beginning with the words " the amount of which shall be determined" and ending with the words and figures " of Rs.600 and a maximum of Rs.1200" the words and figures "at a uniform rate of 30% of basic pay in all cases" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 1996;

(*b*) in sub-rule (4), in clause (*a*), in sub-clause (i), for the portion beginning with the words "for a period of seven years" and ending with the words " whichever period is less" the words "for a period of ten years" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2006;

(*c*) in sub-rule (16), in clause (*b*), after the sub-clause (iii), the following sub-clause shall be added, namely :—

"(*iv*) dependent mother and father, in the order of that preference, having no independent means or source of economic sustenance, in the case of a 'single' Government Servant as declared by him in the Form-3A."

*Explanation 1.*—For the purpose of this clause, a 'single' Government Servant means, a Government Servant, who is the only surviving child of his parents and is unmarried, if married, has no surviving spouse and children.

*Explanation 2.*—The entitlement to Family pension under this sub-rule shall be admissible, if his family as defined under sub-clause (i), (ii) and (iii) of clause (*b*) of Rule 116, ceases to exist.

15. In APPENDIX-V of the Principal Rules, after Form-3, following Form shall be inserted, namely :—

FORM No. 3A

[*Rule* 116 (14)*(b)*]

**SELF DECLARATION TO BE FILED BY A GOVERNMENT SERVANT BEFORE THE HEAD OF THE DEPARTMENT OR HEAD OF THE OFFICE WHO IS NOT BELOW THE RANK OF A CLASS-I OFFICER.**

I, Mr./ Mrs./Miss ........................................................................................ age........................yrs., a permanent resident of (address)...................................................................................................... and presently staying at, (mention here your current address) ................................................................ ........................................................................................................................ do hereby declare on solemn affirmation, that,

(1) I am/was (in the case of a retired Government Servant) holding the post of........................ .......................................................in the ................................................... department of the Government of Maharashtra on the date of this declaration and being governed by the Maharashtra Civil Service (Pension) Rules, 1982, am entitled to/getting the pensionary benefits under the said rules.

(2) My mother Mrs./Smt. ..........................................................................................., aged .................yrs. and/or my father Shri............................................................., aged ..............yrs. is staying with me at my above mentioned address and that having no independent means/ source of economic sustenance of her/his own is solely dependent on me for all her/his financial needs.

I am affixing below a copy of a combined *photograph with my mother and/or father *[ To be attested the Government Servant before the Head of the Department or by the Head of the office if he is an officer not below the rank of Class-I Officer, where he/she is currently working or in the case of a retired Government Servant, where he/she was working at the time of his/ her retirement.]

Date : Signature of the Government Servant.
Place :

Seal of the office. Signature of the attesting Officer
(Designation)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. B. RINGANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),

महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),

महालेखापाल (लेखा परीक्षा)-III, महाराष्ट्र, (५ प्रती),

संचालक, लेखा व कोषागरे मुंबई, (५ प्रती),

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),

संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),

उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,

मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),

वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूरर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),

निवासी लोखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),

सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

*विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,

*प्रबंधक, उच्च न्यायाल, (अपील शाखा), मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

*प्रबंधक, महाराष्ट्र शासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र मुंबई,

आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)

सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,

सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई ४०० ०५१.

ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती),

महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),

मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

सर्व विभागीय आयुक्त (५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

शिक्षण संचालक (शालेय शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),

कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

कुल सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड (१० प्रती),

कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी. कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०.

अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशन, १०९१ अनंतशयन गल्ली, लक्ष्मी निवास, दुसरा मजला, बेळगांव-१, कर्नाटक.

मंत्रालयातील सर्व विभाग,

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),

वित्त विभागातील सर्व कार्यासने.

निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे.